सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९  Website:- www.barti.in  E-mail: - dg@barti.in

## महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या पात्र उमेदवारांसाठी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी जेईई (JEE) आणि नीट (NEET) प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज मागविणेबाबत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई (JEE) आणि नीट (NEET) या प्रवेश परीक्षांचे निःशुल्क अनिवासी प्रशिक्षण खाजगी प्रशिक्षण केंद्राच्या मार्फत **मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर** या ठिकाणी प्रत्येकी JEE-१०० व NEET-१०० जागांकरिता प्रशिक्षण राबविण्यात येत आहे.

**अर्ज करण्यासाठी QR scan करा**

**पात्रता:-**

१. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३. उमेदवार शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ मध्ये इयत्ता ११ वी (विज्ञान) चे शिक्षण घेत असावा.
४. रु. ८ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असेल.
५. अनाथ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक.
६. उमेदवार दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी.

**आरक्षण :-**

- ❖ महिला ३०%, दिव्यांग (PWD) ५%, अनाथ-१%, वंचित-५% (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, इ.साठी), जागा आरक्षित असतील.

**विद्यार्थी निवडीचे निकष :-**

- ❖ प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे गुणवत्तानिहाय उमेदवारांची निवड केली जाईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

१. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३०/०६/२०२४
२. प्रशिक्षण कालावधी २४ महिन्यांचा राहील.
३. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षणा दरम्यान ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधीसाठी उपस्थित राहिल्यास त्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.६०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
४. निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रु.५०००/- एवढी एकरकमी रक्कम अदा करण्यात येईल.
५. सदर योजनेबाबत / प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.

- ❖ **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. १३/०६/२०२४ पासून https://jee-neet.barti.co.in/public/ या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करावी.**

स्वाक्षरी..
**(सुनिल वारे)**
**महासंचालक,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**